दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १६०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.२१ जानेवारी २०२५

**।।सुविचार।।**

प्रत्येकाशी प्रेमाने वागलं पाहिजे. जे तुमच्याशी वाईट वागतात, त्यांच्याशीही प्रेमानच वागल पाहिजे,
**ते चांगले आहेत म्हणून नाही, तर तुम्ही चांगले आहात म्हणून.**

अर्थ मराठी

## झरी तालुक्यात नदी नाल्यांवर रेती चोरट्यांचा धुमाकूळ



**अक्षराज राजू गागरे**

**दि.२०, झरी (यवतमाळ) :** झरी तालुक्यातील नदी नाल्यांवरून ठिकठिकाणी बेकायदेशीर रेती तस्करी जोमात सुरू आहे. मध्य रात्री नंतर पैनगंगा नदी घाट, विदर्भ नदी घाट, खुनी नदी घाट आणि तालुक्यातील छोट्या मोठ्या नाल्यांवरूनही बेकायदेशीर रेतीवर चोरटे डल्ला मारत असल्याचे समजते. मात्र महसूल व पोलीस प्रशासनाचे या चोरीच्या प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे.

तालुक्यात नुकतीच घडलेली घटना आहे की अवैध रेती उत्खनन वाहतूक करताना ट्रॅक्टर पकडला म्हणून रेती तस्कर दोघं भावांनी तलाठी अधिकारी यांना मारहाण केली. सदर घटना झरीजामणी तालुक्यातील गवारा जंगल शिवारात शनीवार ११ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता घडली. परंतु संबंधित प्रशासनाद्वारे रेती तस्करांना लगाम लावण्याला अपयश येत असल्याचे चित्र आहे. मुकूटबन गणेशपूर वरून कोसारा मार्गे तसेच पिंप्रड मार्गावर काही तरूणांना ठीक ठिकाणी ठेऊन येणार्या जाणार्यावर रेकी केल्या जात आहे. निव्वळ रेती चोरण्या साठी सगळा खटाटोप रेती तस्करांकडून होत असल्याचे चित्र आहे.

त्यावरून आता रेती तस्करांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. चोरट्यांच्या मुस्क्या आवरण्याची आवश्यकता बनली आहे.. अन्यथा रेती चोरट्यांची मुजोरी आणखीनच वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अधिकारी यांनी कायदेशीर कारवाई करीत अवैध रेती तस्करी रोखणे गरजेचे झाले आहे.

बेकायदेशीर वाळू रेती तस्करीमुळे पर्यावरणाची गंभीर हानी होते. जैवविविधतेचे नुकसान होते. धूप झाल्याने जमिनीचे अधिकाधिक नुकसान होते. नद्या आणि जलविज्ञान यांच्या कार्यात बदल होऊन प्रदुषण वाढते. ज्यामुळे पाणीपुरवठा कमी होऊन पायाभूत सुविधांचे नुकसान होते. अवैध रेती तस्करी बद्दल असे वाचनात आले आहे की बेकायदेशीर वाळू उपसा बाबत एका संशोधनातून दिसून आले की स्थानिय नदी प्रणाली मध्ये अवैध वाळू उत्खनन सिंचनाच्या पाण्याच्या कमतरतेस कारणीभूत ठरते. यामुळे शेतजमिनीचे नुकसान होते. शिवाय नद्यांच्या पाण्याची गुणवत्ता घसरते. बेकायदेशीर अधिकाधिक खाणकामामुळे खारटपणा वाढू शकते. ज्यामुळे पिण्याच्या पाण्याचे साठे प्रदूषित होते. अंदाधुंद वाळू उपसा मुळे नदी भौतिक आणि जैविक प्रणालीच्या वातावरणाला नुकसान होण्यास कारणीभूत ठरते.. तालुक्यातील प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींकडून याबाबत लोकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. सरकारी संस्थांच्या प्रयत्नानंतरही अवैध वाळू उत्खनन आणि तस्करीच्या समस्या लोकांमध्ये अधिक प्रमाणात अदृश्य असल्याचे वाटते. त्यामुळे रेती चोरटे फायदा घेतात. त्या त्या क्षेत्रातील अधिकार्यांकडे वाळूचा वापर वाळू उत्खनन आणि पर्यावरणीय परिणामांबद्दल अधिकाधिक डेटा आवश्यक झाला आहे. तस्करीच्या समस्यांबद्दल नागरिकांमध्ये जनजागृती आणि त्यास अधिक प्रभावीपणे हाताळण्यासाठी कठोर कायद्याची अंमलबजावणीची आवश्यकता वाटत आहे. नियम आणि दंड ठरवून तस्करी करणाऱ्यांना शोधण्यासाठी अनुकूल भागात गस्त देखरेख वाढवून रेती तस्करांना लगाम लावण्याची गरज वाढली आहे.

## येणारा काळ राष्ट्रवादीचाच हवा : अजित पवार



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, शिर्डी (अहिल्यानगर) :** येणारा काळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा असला पाहिजे, हे आपण सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे, असे सूचक विधान राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी केले. योग्य नियोजन केले तर येणार्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपल्याला नक्कीच फायदा होईल असेही सांगण्यास ते विसरले नाहीत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन दिवसाच्या नवसंकल्प शिबिराची सांगता रविवारी झाली. यावेळी मार्गदर्शन करताना अजित पवार यांनी पक्षाला कशा पध्दतीने पुढे न्यायचे आहे याचा कानमंत्र देतानाच इकडेतिकडे करणार्या पदाधिकार्यांना खडेबोल सुनावले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा सर्व धर्माचा आदर करणारा आहे हे कृतीतून दिसले पाहिजे. नेत्यांपेक्षा हा पक्ष कार्यकर्त्यांचा आहे हेही स्पष्ट झाले पाहिजे. नेत्यांसोबत फिरण्यापेक्षा लोकांमध्ये जा. हा पक्ष लोकांचा वाटला पाहिजे यासाठी काम करा, असा आदेशही अजित पवार यांनी आजच्या शिबिरात दिला.

शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा ही आपली आहे आणि ती कायम राहील. यासाठी तुमची साथ मला हवी आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत एक जबाबदार कार्यकर्ता तयार करून त्याच्यावर २५ कार्यकर्त्यांची जबाबदारी सोपवा. प्रभागात ५० कार्यकर्ते तयार करा. त्यातून २० हजार कार्यकर्त्यांची फळी उभी राहील. राज्यातील प्रत्येक महानगरपालिकांमध्ये अशी यंत्रणा तयार केली तर निवडणुकीत पक्षाला फायदा निश्चित होणार आहे. साईबाबांच्या कर्मभूमीत आणि अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मभूमीतून विकासाची दिशा आणि पुरोगामी विचाराची वाटचाल आपण नवसंकल्प शिबिरातून करत आहोत. येणारा काळ हा राष्ट्रवादी काँग्रेसचा असला पाहिजे. प्रत्येक गावात राष्ट्रवादीचा फलक आणि झेंडा कसा लागेल असा प्रयत्न सर्वांनी करा. हा महाराष्ट्र आहे. एकतेचा आणि समतेचा विचार इथे रुजलेला आहे. जातीपातीचे राजकारण जास्त दिवस चालत नाही. पण सध्या तशा पद्धतीने सध्या जातीपातीचे राजकारण सुरू आहे. याबद्दल नाराजीही अजित पवार यांनी व्यक्त केली. महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले असून जनतेने आपली जबाबदारी पार पाडली आहे. आता आपल्याला ती जबाबदारी पार पाडायची आहे. माझी लाडकी बहिण योजना कोणत्याही परिस्थितीत चालूच राहणार असल्याचे पवार यांनी सांगितले. यासाठी ३७०० कोटींचा चेक महिला आणि बालविकास खात्याला दिल्याचे त्यांनी सांगितले.

# लाडक्या बहिणींसाठी ३,७०० कोटींचा चेक दिला...
## अजित पवारांनीच सांगितले लाकड्या बहिणींना कधी मिळणार पैसे ?




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, मुंबई :** लाडकी बहीण योजना महायुतीला पुन्हा सत्तेत आणण्यासाठी महत्त्वाची ठरली होती. नोव्हेंबरमध्ये निवडणुकीची प्रक्रिया पार पडल्यानंतर नव्या वर्षाचे हप्ते कधीपासून सुरू होणार, याचीच उत्सुकता योजनेच्या लाभार्थी महिलांना लागली होती.

तसेच योजनेबाबत अनेक शंकाकुशंका उपस्थित केल्या जात होत्या. योजनेसाठी निकष लावले जाणार असून अनेक महिला अपात्र ठरू शकतात, अशीही चर्चा मध्यंतरी होती. यावर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. कोणत्या महिलांना या योजनेचा लाभ मिळणार नाही, हे त्यांनी सांगितले आहे. तसेच लाभार्थी महिलांना पुढचा हप्ता कधीपासून मिळणार? याची तारीखही त्यांनी सांगितली आहे.

**काय म्हणाले अजित पवार?**

महायुतीचे सरकार आले तर लाडक्या बहिणींना पैसे मिळणार नाहीत, ते योजना बंद करतील, असा आरोप विरोधकांनी आमच्यावर केला. पण माझ्याकडे अर्थ खाते आहे. आम्ही वचनपूर्ती करणारच आहोत. पण योजनेतल्या त्रुटी असतील त्या आम्ही काढू. जी भगिनी खुरपणीला जाते, धुणी-भांडी करते, जी अतिशय गरीब कुटुंबातून आली आहे. जिल्हा १५०० रुपयांचे महत्त्व समजते, तिलाच योजनेचा लाभ दिला जाईल. ज्या महिला प्राप्तीकर भरतात, ज्या मोठा पगार घेतात, अशा महिलांसाठी हे दीड हजार रुपये नाहीत, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले.

अजित पवार पुढे म्हणाले, ज्या महिलांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांच्या आत आहे. म्हणजे महिन्याला २१ हजारांच्या आत वेतन असलेल्या महिलांनाच आपण ही मदत देणार आहोत. काही काहींनी मधल्या काळात योजनेचा लाभ घेतला. आम्हीही वेळ जाईल म्हणून त्यात फार बारकाईने लक्ष दिले नाही. आता मात्र माझ्या लाडक्या बहिणींना आवाहन आहे की, ज्यांचे उत्पन्न अडीच लाखांच्या वर आहे, त्यांनी गरीब महिलांकरिता लाडकी बहीण योजनेचा लाभ घेऊ नये. मागे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आवाहन केल्यानंतर अनेकांनी गॅसचे अनुदान सोडले होते. तशाच प्रकारे आताही केले जावे.

**३,७०० कोटींचा चेक दिला**

निवडणुकीच्या निकालानंतर आम्ही थोडे व्यस्त होतो. पण परवाच महिला व बाल विकास खात्याकडे ३,७०० कोटींचा चेक दिला असल्याचेही उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे. आता काही महिलांच्या खात्यात पैसे येण्यास सुरुवात झाली आहे किंवा २६ तारखेपासून लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे येण्यास सुरुवात होईल.

## प्रशासणाचा निषेध करत या पंचक्रोशितील ग्रामस्थांनी म्हसणे फाटा टोलनाका बंद केला
### सुपा पोलिस स्टेशनचे निरीक्षक सोमनाथ दिवटे यांची यशस्वी मध्यस्थी



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२०, सुपा (अहिल्यानगर) :** नगर-पुणे महामार्गावर घडणारे अपघात नारायणगव्हाण सुप्यासह धोकादायक गावांच्या प्रश्नासंदर्भात केलेले म्हसणे फाटा टोलनाका बंद आंदोलन उपविभागीय अधिकारी बांधकाम विभाग संजय भावसार यांनी ग्रामस्थांना पुन्हा आंदोलन करण्याची वेळ येणार नाही तातडीने कार्यवाही करण्यासंदर्भात लेखी आश्वासन दिले.

पोलिस सुपा पोलिस स्टेशनचे निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्या मध्यस्थीने आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी ग्रामस्थांनी १ तास टोलनाका बंद करत महामार्गवर महामार्ग संरक्षणाचे पत्रक वितरीत करत प्रशासनाला धारेवर धरले यावेळी उप विभागीय अधिकारी संजय भावसार यांनी व्यवस्थापन चेतक एन्टरप्राईजेस लि.टोल प्लाझा म्हसणे फाटा यांना तातडीच्या सुचना केल्या शिरूर-नगर महामार्गावरील डिव्हाईडर कट बंद करणे, महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्यांना दिशादर्शक फलक, सोलर दिवे, स्पीड ब्रेकर, इत्यादि बाबी तातडीने लावण्यात येणे, महामार्गावर रिफ्लेक्टर सोलर दिवे बसवणे, टोल नाक्यावर मुलभुत सुविधा, सुलभ शौचालय इत्यादी गोष्ट्री पुरविणे, अपघातग्रस्तांना तातडीने सुविधा पुरविणे, वृक्षारोपनाबरोबर वृक्षांचे संगोपन करणे, महामार्गावरील अनधिकृत होर्डिंग तातडीने( चार दिवसात) हटविणे आदी मागण्या तातडीने सुरू करण्यात येणार आहेत.

> नारायण गव्हाण चौपदरीकरणासह नगर पुणे महामार्गाच्या सुरक्षेसंदर्भात कुठलाही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही. प्रशासकीय कामात अडथळा निर्माण करणारांना जेलमध्ये टाका, सदय परिस्थितीला गांभिर्याने घेतले नाही.तर जबाबदार अधिकाऱ्यांना घरी बसवून नगर पुणे महामार्ग टोलमुक्त केल्या शिवाय शांत बसणार नाही.
> **- सचिन शेळके/शरद पवळे**
> **(सामाजिक कार्यकर्ते)**

उर्वरीत मागण्या वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करून पूर्ण करू असे लेखी आश्वासन दिले त्याचबरोबर नारायणगव्हाण भुसंपादनासाठी संयुक्त मोजणी तातडीने करण्यासंदर्भात संबंधीत मिळकत दारांसमवेत दि.२० जानेवारी रोजी नारायण गव्हाणमध्ये समन्वय बैठक घेवून पोलिस संरक्षणात मोजणी करणार असल्याचे तालुका भूमिअमिलेखचे प्रशांत शिंदे, अविनाश गावडे यांनी प्रसंगी आश्वासन दिले. सार्वजनिक बांधकाम विभागाचे गोकूळ घोडके, टोल प्लाझचे व्यवस्थापक भडके, शंकर खोसे आदी उपस्थित होते.

योवेळी सामाजिक कार्यकर्ते शरद पवळे, सचिन शेळके यांच्या नेतृत्वात सुरू झालेले आंदोलन लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले. यावेळी लक्ष्मण शेळके, कैलास गाडीलकर, वाडेगव्हाणचे सरपंच किशोर शेळके, माजी सैनिक पांडूरंग कळमकर, संजय सोनवणे, विकास कळमकर, अमोल शेळके, प्रकाश चव्हाण, अजिंक्यतारा दरेकर, बालाजी कांडेकर, पांडुरंग शेळके, संतोष कोहकडे, संजय साबळे, भाऊसाहेब वाळुंज, दशरथ वाळुंज, शिवाजी नवले, गजेंद्र सरडे आदिसह पंचक्रोशितील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुड मॉर्निंग स्पोर्टस्, नवोदित संघ ठरले चिंतामणी चषक २०२५ चे अंतिम विजेते




**अक्षराज : संदिप येवले**

**दि.२०, मुंबई :** गुड मॉर्निंग स्पोर्टस्, नवोदित संघ यांनी चिंचपोकळी सार्वजनिक उत्सव मंडळाने आयोजित केलेल्या चिंतामणी चषक -२०२५ कबड्डी स्पर्धेत अनुक्रमे पुरुष प्रथम श्रेणी व कुमार गट कबड्डी स्पर्धचे विजेते ठरले. नवोदित संघाचे या महिन्यातील हे सलग दुसरे जेतेपद. गुड मॉर्निंगचा प्रफुल्ल कदम पुरुष प्रथम श्रेणीत, तर नवोदित संघाचा अर्जुन कोकरे कुमार गटात स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरले. दोन्ही खेळाडूंना प्रत्येकी रोख रू.पाच हजार(₹५,०००/-)आणि सुवर्ण पदक प्रदान करण्यात आले.

चिंचपोकळी मुंबई येथील सदगुरू भालचंद्र महाराज क्रीडांगणावर झालेल्या प्रथम श्रेणी पुरुषांच्या अंतिम सामन्यात गुड मॉर्निंग ने लायन्स स्पोर्टस् चा प्रतिकार ३८-२७ असा मोडून काढत रोख रू. पस्तीस हजार(₹३५,०००/-) व चिंतामणी चषकावर आपले नाव कोरले. उपविजेत्या लायन्सला रोख रू. तीस हजार(₹३०,०००/-) व चिंतामणी चषकावर समाधान मानावे लागले. दोन्ही संघानी सुरुवात संथ खेळाने केली. पहिल्या डावात दोन्ही संघानी एक - एक लोण देत गुणफलक हलता ठेवला. विश्रांतीला १५-१४ अशी आघाडी गुड मॉर्निंग कडे होती. दुसऱ्या डावात मात्र गुड मॉर्निंगच्या प्रफुल्ल कदम, तन्मय सावंत, साहिल राणे यांनी आपला खेळ अधिक गतिमान करीत लायन्स संघावर लोण देत व एक अव्वल पकड घेत आपली आघाडी वाढविली. शेवटी ११ गुणांच्या फरकाने सामना आपल्या नावे केला. लायन्सच्या ऋषिकेश कनेरकर, हर्ष मोरे, बाजीराव होडगे यांना पहिल्या डावातील खेळाचे सातत्य न राखता आल्याने पराभवाचा सामना करावा लागला.

कुमारांच्या अंतिम सामन्यात नवोदित संघाने पूर्वार्धातील १७-२१ अशा ४गुणांच्या पिछाडीवरून शिवमुद्रा प्रतिष्ठान चे आव्हान ४६-३० असे हाणून पाडत रोख रू. पंधरा हजार(₹१५,०००/-) व चिंतामणी चषक आपल्याकडे खेचून आणला. उपविजेत्या शिवमुद्राला रोख रू. दहा हजार(₹१०,०००/-) व चिंतामणी चषकावर समाधान मानावे लागले. शिवमुद्राच्या अर्णव हटकर, विशाल लाड यांनी योजना पूर्वक खेळ करीत पहिल्या डावात लोण देत २१-१७ अशी आघाडी राखण्यात यश मिळविले होते. पण दुसऱ्या डावात मात्र ते ढेपाळले. नवोदितच्या अथर्व सुवर्णा, अर्जुन कोकरे, सिद्धेश पाटील यांनी दुसऱ्या डावात झंजावाती खेळ करीत शिवमुद्रावर ३ लोण देत आपला विजय सोपा केला. याच महिन्यात शिवमुद्रा संघाला सलग दुसऱ्यांदा पहिल्या डावात आघाडी घेऊन पराभवाचा सामना करावा लागला. प्रथम श्रेणी गटात उपांत्य उपविजयी ठरलेल्या जय भारत आणि गोलफादेवी यांना प्रत्येकी रोख रू. दहा हजार(₹१०,०००/-) व चषक तसेच कुमार गटात उपांत्य उपविजयी ठरलेल्या हिंदमाता, अमर यांना देखील प्रत्येकी रोख रू. पाच हजार(₹५,०००/-) व चषक देऊन सन्मानित करण्यात आले. जय भारतचा हर्ष मोरे पुरुषांत, तर शिवमुद्राचा विशाल लाड कुमार गटात स्पर्धेतील उत्कृष्ट चढाईचे खेळाडू ठरले. गुड मॉर्निंगचा नंदिश बेर्डे पुरुषांत, तर नवोदितचा ऋषिकेश मालवी कुमार गटात स्पर्धेतील उत्कृष्ट पकडीचे खेळाडू ठरले. या सर्वांना प्रत्येकी रोख रू.दोन हजार पाचशे(₹२,५००/-) व सुवर्ण पदक देऊन गौरविण्यात आले. चिं.सा.उ. मंडळाचे अध्यक्ष श्री.विठ्ठलदास पै, सचिव वासुदेव सावंत, लालबागच्या राजाचे अध्यक्ष बाळासाहेब कांबळे, सचिव सुधीरभाऊ साळवी, राजेंद्र लांजवळ, प्रदीप हरियाणा, राजेंद्र कोतावडेकर, सतीश खणकर, संजोग खामकर, प्रवीण राणे तसेच चिंचपोकळी सार्वजनिक उत्सव मंडळाचे सर्व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत या स्पर्धेचे बक्षीस वितरण पार पडले.

## संपादकीय



### नोकरीच्या शोधात अमेरिकेत गेला अन जीव गमावला !

नोकरीच्या शोधात असलेल्या भारतीय तरुणाची अमेरिकेत हत्या करण्यात आली. रवी तेजा असं या तरुणाचं नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार रवीला गोळ्या झाडून ठार करण्यात आलं अशी माहिती सोमवारी सकाळी त्याच्या पालकांना मिळाली. रवी तेजा अवघ्या २६ वर्षांचा होता. तो मूळचा हैदराबाद या ठिकाणचा होता. हैदराबादच्या आरके पुरम या ठिकाणी त्याचं घर आहे.

**रवी तेजा २०२२ मध्ये अमेरिकेत गेला होता**

रवी तेजा मास्टर्सची डिग्री घेण्यासाठी २०२२ मध्ये अमेरिकेला गेला होता. काही दिवसांपूर्वीच त्याचं शिक्षण पूर्ण झालं. त्यानंतर तो नोकरीच्या शोधात होता. दरम्यान त्याच्यावर गोळ्या झाडून त्याची हत्या करण्यात आली. ही घटना वॉशिंग्टन अ‍ॅव्हेन्यू या ठिकाणी झाली. रवी तेजावर कथित हल्लेखोरांनी थेट गोळीबार केला आणि त्याची हत्या केली अशी माहिती समोर आली आहे. इंडिया टुडेने हे वृत्त दिलं आहे. रवी तेजाची अशी अचानक हत्या झाल्याने त्याचं कुटुंब शोकसागरात बुडालं आहे.

**पोलीस या प्रकरणी करत आहेत पुढील तपास**

या प्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीस हल्लेखोर कोण होते? त्यांनी नेमकी ही हत्या का केली? याबाबतचा शोध घेत आहेत. रवी तेजाचे वडील चंद्रमौली यांनी या घटनेबाबत तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. मी याबाबत काय बोलणार? मी आज माझा मुलगा गमावला आहे. माझा मुलगा जिवंत अमेरिकेत गेला होता आता त्याचा मृतदेह भारतात येतो आहे. कुणावरही अशी वेळ यायला नको. असं त्यांनी म्हटलं आहे. तसंच या घटनेमुळे त्यांचं कुटुंब पूर्पणे दुःखी झालं आहे.

**अमेरिकेत याआधीही घडल्या आहेत अशा घटना**

अमेरिकेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांवर हल्ला होण्याची किंवा त्यांना ठार करण्याची ही पहिली घटना नाही. डिसेंबर २०२३ मध्ये एका गॅस स्टेशनवर भारतीय विद्यार्थ्याला ठार करण्यात आलं होतं. त्या विद्यार्थ्याचं नाव तेजा नुकारापु असं होतं. तो तेलंगणातील खम्मम जिल्ह्याचा रहिवासी होता. तसंच अमेरिकेत तो एमबीए करण्यासाठी आला होता. त्यालाही अशाच पद्धतीने ठार करण्यात आलं होतं.

**२०२० मध्येही एका विद्यार्थ्याची समाजकंटकांकडून हत्या**

२०२० मध्येही अशी एक घटना घडली होती. त्यावेळी भारतीय विद्यार्थ्याची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. तो विद्यार्थीही दक्षिण भारतातलाच होता. हैदराबादमध्ये वास्तव्य करणाऱ्या मोहम्मद मजीबुद्दीनची काही समाजकंटकांनी गोळी झाडून हत्या केली होती.

## आग मलकापूरमध्ये भीषण

**दि.२०, बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर नगरीची आजची सकाळ 'ज्वालाग्रही' ठरली असून भीषण आगीच्या घटनेची वार्ता घेऊन आली. मलकापूर येथील एका मोठ्या कार रिपेअरिंग गॅरेजला भीषण आग लागली. महागड्या कारसह वाहनांचे सुटे भाग (स्पेअर पार्ट्स) या आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.

आज सोमवार, वीस जानेवारीला सकाळी लागलेल्या या आगीचे कारण दुपारी एक वाजेपर्यंत कळू शकले नव्हते. अग्नितांडवात लाखो रुपयांची हानी झाल्याचे सांगितले जात आहे. मलकापूरच्या बुलढाणा मार्गावरील मधुबन नगरमध्ये इरफान भाई यांचे सानिया कार गॅरेज आहे. प्राथमिक माहितीनुसार, आज सकाळी गॅरेजमध्ये भीषण आग लागली. या आगीने पाहतापाहता रौद्ररूप धारण केले. सकाळची वेळ असल्याने आगीची महिती उशिरा मिळाली.

## शशांक वाकडे 'नवी मुंबई महानगरपालिका श्री राज्यस्तरीय' शरीरसौष्ठव स्पर्धेचा मानकरी

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२०, वाशी (नवी मुंबई) :** महानगरपालिकेच्या क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने विविध क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करून नवी मुंबईतील खेळाडू व कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येत असते. यामधील एक महत्त्वाचा उपक्रम हा 'नवी मुंबई महानगर पालिका श्री राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेचा असून १९९६ सालापासून सातत्याने आयोजित केला जात आहे. या माध्यमातून नवी मुंबईतील उदयोन्मुख शरीरसौष्ठवपटूंना आपले क्रीडा प्रदर्शन करण्याची संधी मिळावी या दृष्टीने राज्यस्तरीय स्पर्धेप्रमाणेच 'नवी मुंबई महानगर पालिका क्षेत्र श्री शरीरसौष्ठव स्पर्धा' देखील आयोजित करण्यात येते.

अशाच प्रकारची यावर्षीची स्पर्धा विष्णुदास भावे नाट्यगृहामध्ये राज्यभरातील तसेच नवी मुंबईतील २०० हून अधिक शरीरसौष्ठवपटूंनी पूर्ण क्षमतेने सहभागी होत यशस्वी केली. 'नवी मुंबई महानगरपालिका श्री राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धा' यामध्ये पुणे जिल्ह्याच्या शशांक वाकडे या शरीरसौष्ठवपटूने नवी मुंबई महानगरपालिका राज्यस्तरीय श्री बहुमान पटकावला. सोलापूर जिल्ह्याचे शरीरसौष्ठवपटू पंचाक्षरी लोणार यांनी उपविजेतेपद संपादन केले. मुंबई जिल्ह्याचे निलेश दगडे यांनी 'मोस्ट इम्प्रुव्हड बॉडी बिल्डर' किताब




तसेच पालघर जिल्हयाच्या लकपा लामा यांनी 'बेस्ट पोझर' किताब मिळविला. ५५ किलो, ६० किलो, ६५ किलो, ७० किलो, ७५ किलो, ८० किलो, ८५ किलो व ८५ किलोवरील अशा ८ वजनीगटातील प्रत्येकी सहा विजेत्यांना रोख पारितोषिके व प्रशस्तीपत्रके प्रदान करण्यात आली.

त्याचप्रमाणे 'नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्र श्री शरीरसौष्ठव स्पर्धा' यामध्ये सुरेंद्र डंगवाल यांनी 'नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्र श्री' हा प्रथम क्रमांकाचा चषक संपादन केला. शरीरसौष्ठवपटू प्रशांत गुरव यांनी उपविजेतेपद पटकाविले. ५० किलो, ५५ किलो, ६० किलो, ६५ किलो, ७० किलो व ७० किलो पुढील अशा विविध वजनी गटांत प्रत्येक वजनी गटातील अनुक्रमे ५ विजेत्यांना रोख पारितोषिके व प्रशस्तीपत्रके प्रदान करण्यात आली. याप्रसंगी नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे, नवी मुंबई बॉडी बिल्डर्स असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. संजीव नाईक, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, क्रीडा विभागाच्या उप आयुक्त अभिलाषा म्हात्रे, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव तसेच शरीरसौष्ठव क्षेत्रातील मान्यवर महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशनचे सचिव राजेंद्र चव्हाण उपाध्यक्ष गोपाळ गायकवाड पदाधिकारी शरद मारणे तसेच नवी मुंबई बॉडी बिल्डर्स असोसिएशनचे सचिव हेमंत खेबडे व या दोन्ही संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी शरीरसौष्ठवपटूंना शुभेच्छा देताना महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी आरोग्याचे महत्व अधोरेखित करीत युवा पिढीला व्यायामाची आवड लावणाऱ्या शरीरसौष्ठवा सारख्या क्रीडाप्रकाराला नवी मुंबई महापालिका सातत्याने प्रोत्साहन देत असून या माध्यमातून युवकांमध्ये प्रेरणा निर्माण करीत असल्याचे सांगितले. अंमली पदार्थाचे आरोग्यावर भीषण परिणाम होतात हे लक्षात घेऊन शरीराची होणारी अपरिमित हानी टाळण्यासाठी युवकांनी त्यापासून दूर राहिले पाहिजे व त्यासाठी व्यायामाची आवड जोपासली पाहिजे असे आयुक्त म्हणाले. माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांनीही शरीरसौष्ठवपटूंना शुभेच्छा दिल्या.

नवी मुंबईतील शरीरसौष्ठवपटूंना उत्तेजन मिळावे व त्यांना राज्यभरातील इतर शरीरसौष्ठवपटूंकडून प्रेरणा मिळावी या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिका राज्यस्तरीय श्री शरीरसौष्ठव स्पर्धेचे १९९६ पासून आयोजन करीत असून त्यामध्ये नवी मुंबईतील शरीरसौष्ठवपटूंसाठी स्वतंत्र स्पर्धा घेऊन त्यांना उत्तेजन देण्याचे काम करीत आहे. यामध्ये नवी मुंबईसह राज्यभरातील २०० हून अधिक शरीरसौष्ठवपटूंनी सहभाग घेत स्पर्धा यशस्वी केली.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे झ्युरिचमध्ये उत्स्फूर्त स्वागत

**दि.२०, दावोस :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये उपस्थित राहण्यासाठी झ्युरिच, स्वित्झर्लंड येथे नुकतेच आगमन झाले. हिंदू स्वयंसेवक संघ आणि सेवा स्वित्झर्लंड संस्थेच्यावतीने त्यांचे आनंदाने स्वागत करण्यात आले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा अभिमान व्यक्त करत, स्थानिक मराठी मंडळींनी पारंपरिक पद्धतीने लेझीम खेळत त्यांचे स्वागत केले.

याप्रसंगी, झ्युरिचमधील लहान मुलांनी मराठी गौरवगीत सादर करत 'पुन्हा येण्या'ची भावना अधोरेखित केली. वेदांत, हृषिकेश, रश्मी आणि अद्विका या चिमुकल्या दोस्तांनी आपल्या निरागस शुभेच्छा देऊन उपस्थितांचे मन जिंकले.

### शेती धोरण..

शिवरायांचे अद्भुत
शेती विषयी धोरण
अजूनि ताजे तवाने
हरीत मोहक कुरण

नदी नाल्यास बंधारे
बांधले कालवेधरण
मलिकअंबरीपध्दत
करण्या भूमीमापन

छळवाद नकोकुणा
जारी केलेले ज्ञापन
शेत सारा यथोत्पन्न
बोझा ना निष्कारण

अण्णाजीदत्तो मंत्री
शेतीसद्याया स्फुरण
शेती मूलउपजीवक
साधनाचे सु स्मरण

मेजर जाव्हिस देतो
शिवबांचे उदाहरण
किंमती ठरवी रिती
करायलामूल्यमापन

धान्यानेभरो कोठारे
रयत हो धान्य संपन्न
बळीराजा हवासुखी
छत्रपतींचे भलेसपन

मावळ्यां देई सूचना
ना फुकट दाणापण
लुटालूट नको काही
सरावी भिती दडपण

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

## जायकवाडी पक्षी अभयारण्यात आशियायी पक्षी गणना

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, पैठण (छ.संभाजीनगर) :** जायकवाडी धरणाच्या विस्तिर्ण परिसरात असलेल्या पक्षी अभयारण्यात रविवारी आशियायी पक्षी गणना करण्यात आली. पस्तीस हजार हेक्टर वर असलेल्या या अभयारण्यात सुमारे अठ्ठावीस ठिकाणी एकाच वेळी सकाळी सहा ते अकरा वाजेपर्यंत ही गणना झाली. जायकवाडी पक्षी अभयारण्यात विविध प्रकारच्या पक्षांच्या शेकडो प्रजाती आढळुन आल्या. यात प्रामुख्याने अभयारण्याचे आकर्षण असलेला फ्लेमिंगो हा पक्षी शेकडोच्या थव्याने टाकळी, राम डोव्ह, मावसगव्हान परिसरात विहार करताऩा आढळला. यावेळी जायकवाडीची जैविक विविधता कायम आहे. मात्र स्थलांतरित पक्षांची संख्या रोडावली असल्याचे दिसून आले. पक्षी गणना करण्यासाठी विभागीय वन अधिकारी राहुल सपकाळ यांनी दहा पथके तयार केली होती. यात बॉम्बे नेचरल हिस्ट्री सोसायटी (बीएचएनएस) व पैठण व छत्रपती संभाजीनगर येथील पक्षीमित्र, पक्षी अभ्यासक, सहभागी झाले होते.

सोनवाडी, जायकवाडी अभयारण्य भिंत, पन्नालाल नगर, यासह टाकळी, लांबगव्हाण, दहेगाव, विजापुर, वरखेड, कायगाव टोका, मावसगव्हण, रामडोव्ह, बोट हाऊस, जायकवाडी दक्षिण पंप हाऊस आदि ठिकाणाचा समावेश होता. यात प्रामुख्याने स्थानिक व स्थलांतरित पक्षी आढळले. फ्लेमिंगो कॉमन कूट (वारकरी) स्पॉट बिल (हळदी कुंकू), पोचार्ड, कार्मोरंट, सिगल, व्हिस्पर



टर्न, रिव्हर टर्न, रेड कॅपेड आयबीस, ग्लॉसी आयबीस, ब्लॅक हेडेड आयबीस, ब्राम्ही डक, किंग फिशर, रॉबिन, ब्लॅक विंग स्टील्ट, येलो वेगटेल, आदी पक्षी आढळून आले.

पाणथळ जागेवर व जायकवाडीच्या विस्तिर्ण पाणपसऱ्यावर हे पक्षी मोठ्या प्रमाणात आढळले. सर्वांचे अंतिम अहवाल एकत्र केल्यानंतर लवकरच अभयारण्यात असलेल्या विविध प्रजातींच्या पक्षांच्या संख्या कळणार आहे. पक्षी गणनेसाठी विभागीय वन अधिकारी राहुल सपकाळ, वनपाल, अनिता जाधव, रूपाली सोळसे, श्रीमती शेख, संदीप कराळे, राहुल तरवडे, सोमिनाथ बुधवंत, पैठणचे पोलिस निरीक्षक संजय देशमुख, प्रा.संतोष गव्हाणे, दिलीप भगत, सुनील पायघन, बजरंग काळे, सुनील डिंगरे, अर्जुन कुचे यांच्यासह मानद वनपाल डॉ. किशोर पाठक बीएचएनएस चे मोहीजीत पोदार, अभिनव नायर, कुणाल विभांडिक, किरण परदेशी, राहुल मराठे, प्रमिला मोरे, श्रवण परळीकर आदिंनी सहभाग नोंदवला.

दोन वर्षापूर्वी टॅग (रींग) लावलेला ब्लॅक विंग स्टिल्ट हा पक्षी व रफ, ब्लॅक टेल गॉडविट, ग्रेटर थीकणी हे रशिया युरेशिया, मंगोलिया येथील स्थलांतरीत पक्षी मोहीजीत पोद्दार व प्रा.संतोष गव्हाणे, वनाधिकारी राहुल सपकाळ यांच्या पथकास आढळून आले.

## वाचक पत्र

### माता न तू वैरिणी !

'आ' म्हणजे आत्मा आणि 'ई' म्हणजे ईश्वर. या दोन अक्षरांपासून 'आई' हा शब्द बनतो. ईश्वराच्या आधीही कोणाचा मान असेल तर तो 'आई'चा आहे. आपल्या अपत्यासाठी जीवाचे रान करणाऱ्या, प्रसंगी प्राणाची बाजी लावणाऱ्या, सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या अनेक मातांच्या कथा आपण ऐकल्या आहेत आणि वाचल्या आहेत. प्रत्येकाच्या आयुष्यात आपल्या आईचे अनन्यसाधारण महत्व आहे; मात्र 'आई' सारख्या पवित्र शब्दाला काळिमा फासणाऱ्या घटना तामिळनाडू आणि मुंबई शहरात घडल्या. पोटच्या अल्पवयीन मुलीचे अश्लील व्हिडीओज बनवून ते इंटरनेटवर टाकून मुलीला वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडल्याप्रकरणी तामिळनाडू पोलिसांनी एका दाम्पत्याला अटक केली. मुलीच्या नकळत हे दाम्पत्य मुलीचे अश्लील व्हिडीओ बनवत होते. अशा अनेक अश्लील व्हिडीओ क्लिप्स या पालकांच्या मोबाईलमध्ये पोलिसांना सापडल्या आहेत. या नराधम आई वडिलांना पोक्सो कायद्याच्या अंतर्गत अटक करण्यात आली असून पुढील तपास चालू आहे. अशाच प्रकारच्या एका घटनेतील आरोपी आईला न्यायालयाने नुकतीच नऊ वर्षांची शिक्षा सुनावल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. या आईनेसुद्धा आपल्या अल्पवयीन मुलीला वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडले होते आणि त्यातून मिळणाऱ्या पैशातून ती स्वतःचा चरितार्थ चालवत होती. मातृत्वाच्या पवित्र नात्याला काळिमा फासणाऱ्या या घटना समाजात नैतिक मूल्यांचा किती मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाला आहे हे दर्शवत आहेत. अशा प्रकारच्या घटना यापुढे घडायला नकोत यासाठी न्यायालयाने या मातांना कठोरात कठोर शासन करावे, जेणेकरून भविष्यात असे काही कुकृत्य करण्याचा विचारही कोणाच्या मनात येणार नाही.

**– सौ.मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मुंडे महाविद्यालयात 'रस्ता सुरक्षा अभियान' कार्यक्रम संपन्न



**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.२०, रत्नागिरी (कोकण) :** मंडणगड येथील लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात रस्ते सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने मोटार वाहन विभाग, महाराष्ट्र राज्य व रत्नागिरी जिल्हा उपप्रादेशिक परिवाहन कार्यालय यांच्या वतीने 'रस्ता सुरक्षा अभियान २०२५' जनजागृती अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून मोटार वाहन निरीक्षक अरविंद फुलारी व उपनिरिक्षक सत्यवंत पाटील हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहूल जाधव होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. वाल्मिक परहर, डॉ.संगीता घाडगे, डॉ.विनोदकुमार चव्हाण, डॉ.शैलेश भैसारे, डॉ. महेश कुलकर्णी, प्रा.अशोक कठाळे, प्रा महादेव वाघ, ग्रंथपाल डॉ.दगडू जगताप, वाहन चालक हरी बनसोडे, पेठे मोटार ट्रेनिंग स्कूलचे ट्रेनर हनुमंत भागवत आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ.संगीता घाडगे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. उपनिरीक्षक सत्यवंत पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, वाहन चालवत असताना कोणकोणते कागदपत्र आपल्या सोबत आवश्यक असतात त्याची माहिती दिली. तसेच वाहन चालत असताना कांही धोका झाल्यास काय करावे तसेच आपण रस्त्याने प्रवास करत असताना रस्त्यावर वाहतुकीच्या नियमांची चिन्ह लावलेली असतात. आपण त्याचाही अभ्यास करणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी यावेळी पावरपॉईंट प्रझेंटेशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. वाहन निरीक्षक अरविंद फुलारी शासनाने ठरवून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करणे गरजेचे असून आपण सर्वांनी नियमांचे पालन केल्यास आपला प्रवास नक्कीच सुखकर होण्यास मदत होईल. आपण कोणत्याही प्रकारचे वाहन चालवत असताना काळजी घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संगीता घाडगे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ.शैलेश भैसारे यांनी मानले.

## महाराष्ट्र विद्यालयात क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन संपन्न




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२०, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील खापरखेडा येथील महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय खापरखेडा येथे सोमवार, दिनांक २० जानेवारी २०२५ ते २७ जानेवारी २०२५ या दरम्यान वार्षिक क्रीडा व सांस्कृतिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले असून सदर कार्यक्रमातील क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन वेस्टर्न कोल फिल्ड्स लिमिटेड नागपूर विभागाचे उपमहाव्यवस्थापक जे.व्ही.एस.पी राव यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य अरुण वडस्कर तसेच प्रमुख अतिथी म्हणून वेस्टर्न कोल फील्ड्स लिमिटेड नागपूर विभागाचे एपीएम संजीव सिंग तसेच सीएसआर व्यवस्थापक अजय उपाध्याय जनरल मॅनेजर सिविल एस.पी. तिवारी, विद्यालयाचे उपप्राचार्य चंद्रशेखर लिखार कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रभारी पर्यवेक्षक प्रा.विजय टेकाडे, शिक्षक प्रतिनिधी अभय पुल्लीवार मंचावर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला लेझीम पथकाद्वारे महाराष्ट्रीयन संस्कृतीचे दर्शन घडवीत संगीत शिक्षक मनोज गायकवाड यांच्या चमुने उत्कृष्ट स्वागत गीत सादर करून मान्यवरांचे स्वागत केले. आपल्या उद्घाटनपर भाषणातून विद्यार्थी दशेत खेळ आणि शारीरिक हालचाली किती महत्वपूर्ण असतात. तसेच अभ्यासाच्या दृष्टिकोनातून मानसिक आरोग्य राखण्यासाठी खेळाचे महत्व अनन्यसाधारण असल्याचे मत आपल्या भाषणातून राव यांनी व्यक्त केले. चालू शैक्षणिक सत्रात जे विद्यार्थी राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावर विविध क्रीडा स्पर्धांमध्ये प्राविण्य प्राप्त केले. अशा सर्व विद्यार्थ्यांचा तसेच नुकत्याच झालेल्या खासदार क्रीडा महोत्सवामध्ये विविध गटात रस्सीखेच स्पर्धेत प्राविण्य प्राप्त करणाऱ्या विजयी चमुचे मान्यवरांच्या हस्ते पदक आणि ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य चंद्रशेखर लीखार, संचालन मिलिंद डोंगरे आभार प्रदर्शन क्रीडा शिक्षक धैर्यशील सुटे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. दिगंबर आडे, प्रा. सुजित सायरे, प्रा.संगीता चव्हाण, प्रा.सुषमा वानखेडे, प्रा.श्वेता रोकडे, प्रा.पपीता नेहारे, प्रा.अर्चना युवनाते प्रा.शंकर राठोड, प्रा.दीप्ती कुरुडकर, प्रा.लुटे, प्रा.किशोर पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले.

## शिवशंभू विचार मंचाचे अभय जगताप यांना पितृशोक



**अक्षराज : विकास दळवी**


**दि.२०, ठाणे :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते, शिवशंभू विचार मंचाचे कोकण प्रांत संयोजक, भारतमाता सेवा तसेच शिवसंस्कृती प्रतिष्ठान यांचे संस्थापक अध्यक्ष अभय जगताप यांचे वडील दिनकर जगताप यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. रविवार, दि. १९ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९.१५ वाजताच्या सुमारास त्यांची प्राणज्योत ठाणे येथे मालवली. अभय जगताप यांच्या पितृशोकात भारतमाता सेवा प्रतिष्ठान आणि शिवसंस्कृती प्रतिष्ठान परिवार सहभागी असून दिनकर जगताप या तपस्वी आणि विद्वान व्यक्तिमत्त्वाला भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

# महाराष्ट्र राज्य कबड्डी संघाच्या संवर्धनाकरीता दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक लि.चे प्रायोजकत्व

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.२०, मुंबई :** महाराष्ट्रात प्रसिद्धीच्या शिखरावर असलेल्या कबड्डी या खेळाला महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक लि.चे प्रायोजकत्व. राष्ट्रीय तसेच फेडरेशन चषक कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघांना दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक लिमिटेड चे प्रायोजकत्व लाभले आहे.

१ फेब्रुवारी २०२५ ते ३१ मार्च २०३० पर्यंत ५ वर्षांसाठी हा करार झाला असून, त्यासाठी दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक लिमिटेडकडून महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनला ९५ लाख रुपये देण्यात आले. बारामती येथे झालेल्या छत्रपती शिवाजी महाराज करंडक कबड्डी स्पर्धेच्या पारितोषिक वितरण



कार्यक्रमात दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक लि.चे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी हा धनादेश महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सरचिटणीस बाबुराव चांदेरे आणि कोषाध्यक्ष मंगल पांडे यांना सुपूर्द केला.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक लिमिटेड आणि महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन यांच्यातील करारान्वये राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांकरिता निवडण्यात आलेल्या राज्याच्या संघातील खेळाडू, प्रशिक्षक, व्यवस्थापक यांचा गणवेश आणि अन्य साहित्याचा समावेश असेल.

पुढीलत ५ वर्षे पुरुष-महिला गट, कुमार-कुमारी गट, किशोर-किशोरी गट या राष्ट्रीय स्पर्धा, पुरुष-महिला गट, कुमार-कुमारी गट या फेडरेशन चषक स्पर्धा आणि बीच कबड्डी स्पर्धेसाठीच्या राज्याच्या संघासाठीच्या गणवेश आणि अन्य साहित्याला दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक लिमिटेड यांचे प्रायोजकत्व असेल. राज्यस्तरीय आणि राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत नेमण्यात आलेल्या पंचांच्या गणवेशाचाही यात समावेश आहे, असे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे कोषाध्यक्ष मंगल पांडे यांनी सांगितले.

# २७ जानेवारी ला सप्तरंगी साहित्य मंडळाचे चौथे जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलन

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२०, मुदखेड (नांदेड) :** प्रज्ञादर्शन शिक्षण संस्था मुदखेड व सप्तरंगी साहित्य मंडळ, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील रणछोडदास मंगल कार्यालयात येत्या दिनांक २७ जानेवारी २०२५ रोजी सप्तरंगी साहित्य मंडळाच्या चौथ्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री खा.अशोक चव्हाण यांच्या हस्ते होणार असून संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जगदीश कदम यांची निवड करण्यात आली आहे. या संमेलनासाठी आ.ॲड श्रीजयाताई चव्हाण, माजी संमेलनाध्यक्ष कवी अनंत राऊत, पाणी चित्रपट फेम अभिनेत्री माधुरी लोकरे, आंतरराष्ट्रीय ख्यातकीर्त लावणी बालकलाकार डॉ. विद्याश्री येमचे यांच्यासह उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टे, तहसीलदार आनंद देऊळगावकर, पोलीस निरीक्षक वसंत सप्रे, नपचे मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश फडसे, गटशिक्षणाधिकारी रुस्तम आडे, माजी गटशिक्षणाधिकारी दिलिप सुपे, ओबीसी चळवळीतील राष्ट्रीय नेते एस. जी. माचनवार यांची उपस्थिती राहणार आहे.

दिवसभरात ग्रंथदिंडी, चित्र व नाणी प्रदर्शन, पुरस्कार वितरण, परिसंवाद, प्रकाशने, कथाकथन, गझलसंध्या, कविसंमेलन अशा विविध स्तरांतून साहित्य संमेलन संपन्न होणार असल्याची माहिती स्वागताध्यक्ष प्रविणदादा गायकवाड निमंत्रक प्रल्हाद इंगोले, सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे, कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, जिल्हाध्यक्ष रणजित गोणारकर यांनी येथील विश्राम गृहात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

सप्तरंगी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित सप्तरंगी साहित्य मंडळाचे चौथे जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलन मुदखेड शहरात संपन्न होत आहे. या संमेलनाची सुरुवात सकाळी ९ वा. ग्रंथदिंडीने होईल. त्यानंतर मुख्य समारंभ संपन्न होईल. उद्घाटन समारंभानंतर येथील प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांच्या अध्यक्षतेखाली 'संविधान लाभधारकांची भूमिका' या विषयावरील परिसंवादात प्रा. संजय बालाघाटे, ॲड विजय गोणारकर, बालाजी थोटवे हे चिंतक आपले विचार ठेवार आहेत.

दु. ४.०० वा. कथाकथन होईल. यात सुप्रसिद्ध कथाकार दिगांबर कदम यांच्या अध्यक्षतेखाली राम तरटे, स्वाती कान्हेंगावकर, सुरेश वडजे हे आपल्या स्वरचित आणि सुरस कथाकथनाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. त्यानंतर गझलसंध्या हा महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गझलकारांचा कार्यक्रम होईल. यात रोहिणी पांडे, स्वाती भद्रे, अंजली मुनेश्वर, दिपाली कुलकर्णी, निशा डांगे, विजय वाठोरे, विजय धोबे हे गझलकार सहभागी होतील. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आत्मन गेंदे हे असतील.

यानंतरच्या सत्रात सुप्रसिद्ध कवी बालाजी कळसे यांच्या अध्यक्षतेखाली ५० कवींचे कविसंमेलन संपन्न होणार आहे. यात प्रमुख अतिथी कवी म्हणून सदानंद सपकाळे, अशोक कुबडे, निरंजन तपासकर हे उपस्थित राहतील. म्हणून समारोपीय सत्रात संमेलनाध्यक्ष, स्वागताध्यक्ष, निमंत्रक व सप्तरंगी साहित्य मंडळाचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत ठराव वाचन होणार आहे.

दरम्यान, जनसंवाद विशेषांकाचे प्रकाशन व इतर प्रकाशने होणार असून मिलिंद जाधव, साहेबराव डोंगरे व संतोष तळेगावे यांचे चित्र व नाणी प्रदर्शन होणार आहे. तसेच विविध क्षेत्रातील कार्यरत मान्यवरांना जनसंवाद पुरस्कार - २०२५ देऊन गौरविण्यात येणार आहे. यात प्राचार्य मालपाणी हरिप्रसाद, विकुदास होट्टे, गणेश भालेराव, सुभाष गड्डम, जीवन मांजरम कर, मारोती काळबांडे, गंगाधर लव्हाळे, गजानन हिंगमिरे आदींचा समावेश आहे.

तसेच मातोश्री भागाबाई डोंगरे प्रतिष्ठान, उमरीच्या पुरस्कारांचेही वितरण होणार आहे. संमेलनाच्या यशस्वीतेसाठी सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे, उपाध्यक्ष पांडुरंग कोकुलवार, सचिव कैलास धुतराज, कार्यालयीन सचिव मारोती कदम, कोषाध्यक्ष शंकर गच्चे, कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, राज्य समन्वयक बाबुराव पाईकराव, महिला विभाग प्रमुख रुपाली वागरे वैद्य, जिल्हाध्यक्ष रणजित गोणारकर, सचिव चंद्रकांत कदम, उमेश वंजारे, दत्ताहरी कदम, प्रकाश ढवळे नागलगांवकर, राहुल जोंधळे, डॉ. गजानन देवकर, प्रल्हाद घोरबांड, पंडित पाटील बेरळीकर, संजय भारदे, शिवाजी गोडबोले, जळबा सोनकांबळे, गौतम कांबळे, विशालराज वाघमारे, सुभाष लोखंडे आदी परिश्रम घेत आहेत.


**मुख्य प्रवेशद्वारास शहीद गोविंदसिंह राठौर यांचे नांव**

मुदखेड शहरातील रणछोडदास मंगल कार्यालयात होणाऱ्या चौथ्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाच्या मुख्य प्रवेशद्वारास शहीद गोविंदसिंह राठौर यांचे नांव देण्यात आले असून मुख्य विचारमंचाला क्रांतिबा ज्योतिबा फुले यांचे नाव देण्यात आले आहे. परिसरात निसर्ग कवी ना. धों. महानोर साहित्य नगरी तर काव्यमंचास कालवश कवी शरदचंद्र हयातनगरकर यांचे नाव देण्यात आले आहे.

# जिल्ह्यात १ लाख १३ हजार हेक्टरवर कांदा लागवड

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, अहिल्यानगर :** जिल्ह्यात यंदाही कांदा लागवडीला शेतकऱ्यांना प्राधान्य दिल्याचे दिसून येत आहे. आतापर्यंत जिल्ह्यात रब्बीत १ लाख १३ हजार ६२७ हेक्टरवर कांदा लागवड झाली आहे. अजूनही लागवडी जोरात सुरू आहेत. त्यामुळे यंदा रब्बी आणि उन्हाळी मिळूनच दीड लाखापेक्षा अधिक हेक्टरवर कांदा लागवड होण्याचा अंदाज आहे. खरीप, लेट खरीप, रब्बी व उन्हाळी मिळून यंदा चाळीस हजार हेक्टरच्या जवळपास क्षेत्र वाढण्याचा अंदाज आहे.



उसाचा आणि साखर कारखान्यांचा जिल्हा अशी ओळख असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यात गेल्या दहा वर्षांपासून कांदा, कापूस व अन्य पिकांचे क्षेत्र वाढत आहे. अलीकडच्या चार-पाच वर्षांत कांद्याकडे शेतकऱ्यांचा कल आहे. मागील दोन वर्षांत कांद्याला पुरेसा दर मिळाला नाही. यंदाही फारसा दर नाही असे असूनही कांदा लागवड क्षेत्र वाढतच आहे. खरीप, लेट खरीप, रब्बी व उन्हाळी मिळून साधारणपणे दोन लाख हेक्टरवर कांद्याचे क्षेत्र असते. यंदा त्यात बऱ्यापैकी वाढ होताना दिसत आहे.

यंदा खरिपात २० हजार २६८ हेक्टर, लेट खरिपात ५५ हजार ३४८ हेक्टर सरासरी क्षेत्र निश्चित केले होते. मात्र यंदा खरिपात ३६ हजार ३८१, तर लेट खरिपात ७८ हजार ८१४ असे १ लाख १५ हजार १९५ हेक्टरवर लागवड झाली होती.

रब्बीचे १ लाख १९ हजार ५६१ हेक्टर सरासरी क्षेत्र निश्चित आहे. यंदा आतापर्यंतच रब्बीत १ लाख १३ हजार ६२७ हेक्टरवर कांदा लागवड झाली आहे. मागिल २ वर्षात कांद्याला पुरेसा दर मिळाला नाही. यंदाही फारसा दर नाही असे असूनही कांदा लागवड क्षेत्र वाढतच आहे.

खरीप,लेट खरीप, रब्बी व उन्हाळी मिळून साधारणपणे २ लाख हेक्टरवर कांद्याचे क्षेत्र असते. यंदा त्यात बऱ्यापैकी वाढ होताना दिसत आहे. अजूनही लागवडी जोरात सुरू आहेत. उन्हाळी कांदा लागवड रब्बीतच धरली जाते.

यंदा वर्षभरात आतापर्यंत खरीप, लेट खरीप, रब्बी मिळून २ लाख २८ हजार हेक्टर क्षेत्रावर कांदा लागवड आहे.

३० ते४० हजार हेक्टर क्षेत्र वाढणार असल्याने यंदा वर्षभरातील मिळून पावणेतीन लाख हेक्टर पर्यंत कांदा लागवड होण्याचा कृषी विभागाचा अंदाज आहे. यंदा पावसाळ्यात चांगला पाऊस झाला असे प्रशासन सांगत असले तरी आतापासूनच काही भागात पाणीटंचाई जाणवू लागली आहे. यंदा पारनेर, श्रीगोंदा, नेवासा, शेवगाव, कर्जत भागातून कांदा पिकाला अधिक प्राधान्य दिल्याचे दिसून येत आहे.

**रब्बीतील कांदा लागवड हेक्टरमध्ये अहिल्यानगर २९०४, पारनेर ३१,८२४, पाथर्डी १२५, कर्जत ८८१९, जामखेड ७३७८, श्रीगोंदा ११०५९, श्रीरामपूर ४२६०, राहुरी ८२३, नेवासा २०१२१, शेवगाव ९०१०, संगमनेर ५७०, कोपरगाव ८३३६, अकोले ६२४०, राहाता ३४१६**

# संसद कट्टा अंतर्गत उपमुख्यमंत्री पवार आणि छगन भुजबळ यांची मुलाखत

**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.२०, खडकवासला (पुणे) :** युवा शक्तीला योग्य गती व दिशा देऊन समाजकारण आणि राजकारणामध्ये त्यांचे अधिष्ठान निर्माण करण्याकरीता तसेच सशक्त युवा, सशक्त राजकारण व सशक्त भारताकरीता तरुणाईने पुढाकार घ्यावा, याकरिता पुण्यामध्ये आठव्या युवा संसदेचे आयोजन करण्यात आले आहे. न-हे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस्, पुणे तर्फे गुरुवार, दिनांक ३० व शुक्रवार, दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ यावेळेत संस्थेच्या सभागृहात ही संसद होणार आहे. अशी माहिती इन्स्टिट्यूटचे उपाध्यक्ष व संसदेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावर्षी संसद कट्टा अंतर्गत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांचे मुलाखतीचे सत्र होणार आहे. संसदेत मागील वर्षी शिवसेनेचे नेते संजय राऊत यांची मुलाखत झाली होती. माजी कॅबिनेट मंत्री महादेव जानकर, माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी, गणराज्य संघाच्या संस्थापक अध्यक्ष सुषमा अंधारे, ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे, भारतीय छात्र संसदेचे अध्यक्ष राहुल कराड, जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस्चे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर हे संसदेच्या कार्यकारिणीमध्ये आहेत.




संसदेत देशभरातील राजकारण, समाजकारण आणि विविध विषयांतील तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी महाराष्ट्रातील तरुणांना मिळणार आहे. महाराष्ट्रातून सुमारे १५०० हजार विद्यार्थी संसदेत सहभागी होणार आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, लायन्स क्लब इंटरनॅशनल, रोटरी इंटरनॅशनल यांच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी संसदेत सहभागी होणार आहेत. पुण्यासह सोलापूर, अकोला, कोल्हापूर, मराठवाडा, कोकण यांसह विविध भागांतून विद्यार्थी संसदेकरीता येणार आहेत.

ॲड.शार्दुल जाधवर म्हणाले, ग्रामसभा ते लोकसभा, राजकारणातील व समाजकारणातील महिलांचा सहभाग, माध्यमे राजकारण घडवतात?, व्हिजन भारत २०२९, सशक्त युवा सशक्त राजकारण सशक्त भारत या विषयांवर संसदेत सत्र होणार आहेत. राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक अशा विविध विषयांवर अनेक मान्यवर आपले विचार मांडणार आहेत. वय वर्षे १६ ते ४० मधील तरुणांनी संसदेत सहभाग घ्यावा.

संसदेत सहभागी होण्याकरीता मोफत प्रवेश असून विद्यार्थीनींची एक दिवसाची पुण्यामध्ये राहण्याची आणि जेवणाची सोय करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी संसदेतील सहभागाकरीता मो.९०६७९०९०७५ या क्रमांकावर संपर्क साधावा आणि https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSf6CfpTukLUpQlzJRzogegIQ7jfbUQhEzs1AFL9j3J5miAuYw/viewform या लिंकवरुन फॉर्म भरावा. त्यानुसार विद्यार्थ्यांची नोंदणी होणार आहे. संसदेच्या माध्यमातून युवकांनी राजकारण आणि सम ाजकारणातील दिग्गजांसोबत संवाद साधावा, हा याम ागील मुख्य उद्देश आहे. संसदेकरीता प्रवेश विनामूल्य आहे, तरी तरुणाईने मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

# महापालिकेच्या विभाग प्रमुखांच्या बैठकीत जलदगतीने कामे करण्याच्या सूचना

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२०, पनवेल :** महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरू असलेल्या विविध विकास कामांचा विभागवार आढावा सोमवार, दिनांक २० जानेवारी २०२५ रोजी मुख्यालयात झालेल्या बैठकित प्रशासक तथा आयुक्त मंगेश चितळे यांनी घेतला. यावेळी विकास कामे जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्तांनी संबंधित विभागाला दिल्या. यावेळी उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त बाबासाहेब राजळे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते, उपायुक्त रविकिरण घोडके, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, उपमुख्य लेखा परीक्षक संदिप खुरपे, उपअभियंता विलास चव्हाण, सहाय्यक अधिकारी स्वरूप खारगे, सहाय्यक आयुक्त स्मिता काळे, सहाय्यक आयुक्त डॉ.रूपाली माने, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण तसेच सर्व विभाग प्रमुख व अधिकारी उपस्थित होते. यावेळी पालिका हद्दीतील मृतदेह ठेवण्यासाठी शीतगृह उभारण्याबाबत अंदाजपत्रक तयार करणे, महापालिका हद्दीतील सर्व स्मशानभूमी अत्याधुनिक करणेस्तव नियोजन करणेबाबत बांधकाम विभागस सूचित करण्यात आले. याबरोबरच तीन ठिकाणी शाळा बांधणेस्तव अंदाजपत्र तयार करणे, पार्किंग स्थळे व वाहनांची क्षमता लक्षात घेऊन शुल्क आकारणीबाबत पॉलिसी तयार करणे. अशा विविध बांधकाम विभागाशी संबधित कामाचा यावेळी आढावा घेण्यात आला.

स्काय वॉकवर सोलर पॅनल बसविणे व महापालिका हद्दीत कोठेही वीज चोरी होत नाही. याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत विद्युत विभागास आयुक्तांनी सूचित केले. अल्पसंख्यांक समाजासाठी विविध ठिकाणी दफनभूमी तयार करणेस्तव जागा निश्चित करणे. आदिवासी बांधवांना राहण्यासाठी जागा उपलब्ध करणे. आसुडगाव प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत भूखंडाबाबत पाठपुरावा करणे बाबत नगर रचना विभागास आयुक्तांनी सूचित केले. महापालिका हद्दीत सार्वजनिक ठिकाणी शौचालय उभारणेस्तव नियोजन करणे, कळंबोली स्टील मार्केट येथे अत्याधुनिक शौचालय उभारणेस्तव नियोजन करण्याबाबत आरोग्य विभागास आयुक्तांनी सूचित केले. तसेच पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये धुळप्रदुषण करिता एअर मॉनिटर बसविणेबाबत कामाचा आढावा



आयुक्तांनी घेतला. पनवेल महानगरपालिका हद्दीत अनधिकृत आठवडा बाजार बसू नये याची खबरदारी घेण्याबाबत आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचित केले. फेरीवाला व्यवसाय धारकाची नोंदणी व त्यांना परवाना देणेबाबत संबधित विभागास सूचित करण्यात आले. सर्व प्रभाग अधिकाऱ्यांनी अनधिकृत होर्डिंग्स, फ्लेक्स, बॅनरवरती तात्काळ कारवाई करण्यात यावी तसेच त्यांना नोटीस देऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश आयुक्तांनी यावेळी प्रभाग अधिकाऱ्यांना दिले. नगरपरिषद प्रशासन संचालनालय अंतर्गत कोकण विभागास्तरीय स्पर्धांमध्ये पनवेल महानगरपालिकेने मि ळवलेल्या यशाबद्दल संबंधित अधिकाऱ्यांचे आयुक्तांनी कौतुक केले.

# राज्यस्तरीय सामूहिक १०८ सूर्यनमस्कार शिबीर यशस्वी संपन्न

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१९, गोरेगाव (मुंबई) :** दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी, महाराष्ट्र योगशिक्षक संघचे संस्थापक अध्यक्ष डॉ.मनोज निलपवार यांच्या मार्गदर्शनाखाली, महाराष्ट्र योगशिक्षक संघ मुंबई जिल्हा आणि व्हीनस कल्चर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय सामूहिक १०८ सूर्यनमस्कार शिबिरामध्ये १७० हून अधिक योगप्रेमी सहभागी झाले होते.



ह्या कार्यक्रमामध्ये गोरेगाव विभागातील सन्माननीय आमदार विद्याताई ठाकूर, संपादक योगवार्ता, योग विद्या निकेतनचे श्रीधर पांडूरंग परब जी, भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष जयप्रकाश ठाकूर तसेच महाराष्ट्र योगशिक्षक संघाचे कोकण विभाग प्रमुख व योगाचार्य विश्वास शिर्के असे प्रमुख म ान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र योगशिक्षक संघ मुंबई जिल्ह्याचा ह्या दुसऱ्या वर्षीच्या उपक्रमामध्ये योगसाधकांचा भरभरून प्रतिसाद लाभला व सर्व योगसाधकांनी १०८ सूर्यनमस्कार झाल्यानंतर जल्लोषात आनंद साजरा केला.

या सर्व नियोजनात मुंबई जिल्ह्याचे महासचिव कृष्णकुमार शिंदे, कोषाध्यक्षा रिद्धी देवघरकर, सचिव अमित चिबडे, सुषमा माने, उपाध्यक्षा हेमवंता जिजाबाई, साक्षी कलगुटकर, प्रियांका ढोले, सोशल मीडिया प्रभारी प्रशांत मकेसर, संघटन सचिव विकास ओव्हाळ, सदस्य विजयालक्ष्मी शर्मा, श्वेता पिसाळ, रेश्मा धुरी पाटील, अर्निका बांदेलकर, मनुजा चव्हाण, हिरा गणवीर, भारती कवनकर, कांचन राणे, प्रसाद काठे, वर्षा शर्मा, जयदीप कनकिया, हेरंब म्हात्रे, सचिन येवले, अमोल देवघरकर, रक्तदान दाता साई रामपूरकर यांच्या सर्वांच्या मेहनतीने व उपस्थित साधकांमुळे हे उपक्रम यशस्वी झाल्याचे प्रसारमाध्यमांना अधीक माहिती देताना मुंबई जिल्हा अध्यक्ष संतोष खरटमोल यांनी सांगितले.

# काळभैरव नमन मंडळ वाडदई यांच्या नमन प्रयोगाला उदंड प्रतिसाद

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२०, गुहागर (रत्नागिरी) :** गुहागर तालुक्यातील वाडदई वरची वाडी श्री बाळमित्र सेवा मंडळ(मुंबई) आयोजित श्री काळभैरव नमन मंडळ यांचे ह्या मोसमातील नमन कार्यक्रमाचा शुभारंभ प्रयोग रविवार, दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी साहित्य संघ मंदिर (गिरगाव) मुंबई येथे मोठ्या उत्साहात हाऊसफुल्ल गर्दीत संपन्न झाला. कवी/दिग्दर्शक अशोक दुदम यांच्या संकल्पनेतून साकारलेली गण,गौळण आणि भरत कळंबाटे लिखित नारळ मानाचा ह्या समाजप्रबोधनपर नाट्यकृतीला रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

सदर नमन प्रयोग हा आमदार भास्कर जाधव यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या सुवर्ण-भास्कर नमन स्पर्धा-२०२५ मध्ये सहभागी झाले असून परिक्षक म्हणून अश्विनी निवाते यांनी परीक्षण केले. कार्यक्रमाला जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य नेत्राताई ठाकुर, आमदार भास्करराव जाधव याचे सहकारी महेश गोवलकर, परीक्षक, अश्वीनी निवाते-लोककला अभ्यासक, दिपक भरणकर, सामाजिक कार्यकर्ता/पत्रकार उदय दणदणे, माजी तंटामुक्ती अध्यक्ष विनायक कांबळे आदी विविध क्षेत्रातील उपस्थित मान्यवर होते.

# उदगीर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने ५१ जणांचे रक्तदान

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२०, उदगीर (लातूर) :** उदगीर राज्य रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत उदगीर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने सोमवार, दि.२० रोजी राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण व सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी आशिष कुमार अय्यर यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्रादेशिक परिवहन कार्यालय उदगीर येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी उपस्थित नागरिकांना रस्ता सुरक्षा विषयी, रक्तदानाविषयी तसेच goods Samatitan इत्यादी विषयाबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यक्रमास प्रादेशिक परिवहन कार्यालय लातूर तर्फे मोटार वाहन निरीक्षक शांताराम साठे, मोटार वाहन निरीक्षक सहा.राजकुमार नरसगोंडे, गणेश जाधव व रक्तपेढीचे डॉ.राम पाटील, नर्स शिल्पा चाटे, पीआरओ महेश जवळगे, टेक्निशन बालाजी चौधरी, जया आडे, शासन नियुक्त अशासकीय सदस्य ग्राहक संरक्षण परिषद तथा जिल्हा संघटक ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्याचे लातूर जिल्हा संघटक बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर व उदगीर कार्यालयातील सर्व कर्मचारी, वाहन चालक उपस्थित होते.



# थोडक्यात

## प्राचार्य शांताराम गव्हाणकर विद्यामंदिर शाळेचा १०० टक्के निकाल

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२०, माथेरान :** महाराष्ट्र शासन कला संचालनालय, मुंबई, यांच्या अंतर्गत सप्टेंबर २०२४ मध्ये घेतल्या गेलेल्या शासकीय रेखाकला परीक्षा २०२४ या परीक्षेत प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिर, माथेरान या शाळेचा १०० टक्के निकाल लागला. प्रत्येक वर्षी महाराष्ट्र राज्य कला संचालनालय मुंबई यांच्यामार्फत चित्रकलेच्या एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट परीक्षा संपूर्ण राज्यात एकाच वेळी घेतल्या जातात. दरवर्षी आपल्या शाळेतून या परीक्षेसाठी संघपाल वाठोरे विद्यार्थ्यांची तयारी करून या परीक्षेत बसवतात. मागील ३ वर्षांचा एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट आपल्या शाळेचा १०० टक्के निकाल आहे. यावर्षी आपल्या शाळेचे एकूण २८ विद्यार्थी या परीक्षेत बसले होते. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत ग्रेड वाईस ७, ५ आणि ३ याप्रमाणे अतिरिक्त गुण मिळतात. महाराष्ट्र शासन कला संचालनालय, मुंबई, यांच्या अंतर्गत सप्टेंबर २०२४ मध्ये घेतल्या गेलेल्या शासकीय रेखाकला परीक्षा २०२४ या परीक्षेत प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिर, माथेरान या शाळेचा १०० टक्के निकाल लागल्याने सर्व स्तरातून शाळेचे विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांवर कौतुक वर्षा होत आहे. शासकीय रेखकला दोन्ही परीक्षेसाठी शिक्षक संघपाल वाठोरे यांनी विद्यार्थ्याची तयारी करून घेतली शिक्षकांच्या विश्वासाला विद्यार्थ्यांनीही कुठे तडा न जाऊन देता यश संपादन केले.

## माता सावित्रीबाई फुले महिला बचत गटाचा हळदीकुंकू समारंभ साजरा

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१९, डोंबिवली (ठाणे) :** दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, वीर सावरकर रोड तेथे आमदार, रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली माता सावित्रीबाई फुले महिला बचत गटाचा हळदी कुंकू समारंभ जल्लोषात संपन्न झाला.



माता सावित्रीबाई फुले महिला बचत गटाचे अध्यक्ष मीना राजेंद्र अहिरे यांनी कार्यक्रम ामध्ये आलेले मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी डोंबिवली पूर्व मंडळ महिला आघाडी अध्यक्ष पूनम पाटील, डोंबिवली पूर्व महिला आघाडी सरचिटणीस वर्षा परमार, डोंबिवली पूर्व मंडळ शहर सरचिटणीस मितेश पेणकर, कल्याण पश्चिमचे सचिव पंढरीनाथ मात्रे आणि डोंबिवली पूर्व पश्चिमचे महिला मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. या हळदीकुंकू समारंभ कार्यक्रमात अक्षता राज पटवे सल्लागार यांनी मोफत आरोग्य शिबीर राबविण्यात आले असून महिलांना आरोग्य विषयी माहिती त्यांनी दिले. त्याचबरोबर माता सावित्रीबाई फुले, माता रमाबाई, माता अहिल्याबाई होळकर, माता जिजाऊ असे सर्व महामातांच माहिती देण्यात आली. या कार्यक्रमामध्ये महिल, लहान मुलं आणि भाजपाचे पदाधिकारी यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिले असून सूत्रसंचालन भारतीय जनता पार्टी उपाध्यक्ष अनुसूचित जाती मोर्चा डोंबिवली पूर्व मंडा राजेंद्र वामन अहिरे आणि भारतीय बौद्ध महासभा प्रबोधनकार छाया कांबळे यांनी केली.

## श्रीहरी पवळे यांच्या हस्ते कला प्रदर्शनाचे उद्घाटन

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.२०, नवी मुंबई :** पोदार इंटरनॅशनल स्कूल वायले नगर कल्याण मध्ये वार्षिक कला प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन उपक्रमशील कलाशिक्षक आंतरराष्ट्रीय रांगोळीकार श्रीहरी पवळे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे पदाधिकारी शाळेच्या मुख्याध्यापिका संजीवनी भोसे शालेय प्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होता.




भारतातील विविध प्रांतातील कला, संस्कृती, खाद्यपदार्थ आणि नृत्य परंपरा अशा विविधतेने नटलेल्या या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य होते. या प्रदर्शनात एकूण ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपली कला सादर केली. याप्रसंगी उद्घाटक श्रीहरी पवळे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. अशा वैशिष्ट्यपूर्ण कला प्रदर्शनात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे कला शिक्षक आणि इतर शिक्षकांचे कौतुक केले. कलाशिक्षिका अमृता रत्नपारखी, सुवर्णा शिरसाट आणि इतर सहकारी सर्व शिक्षकांनी प्रदर्शनासाठी खूप मेहनत घेतली. शाळेच्या मुख्याध्यापिका संजीवनी भोसे यांनी श्रीहरी पवळे यांचा सन्मान करून आभार मानले.

## स्वातंत्र्य सैनिक गोमाजी पाटील स्मृती पुरस्कार २०२५ संपन्न

**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.१९, शहापूर (ठाणे) :** स्वातंत्र्य सैनिक गोमाजी पाटील स्मृती पुरस्कार २०२५ नुकताच जीवनदीप महाविद्यालय गोवेली या ठिकाणी पार पडला. त्याचबरोबर साहित्यिक गिरीश कंठे लिखित क्रांती पर्व या कादंबरीचे प्रकाशन सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमात लेणाड बुद्रुक गावचे पोलीस पाटील एकनाथ बुधा विशे (पानिपतकार विश्वास पाटील यांच्या साहित्याचे गाडे अभ्यासक) यांना सामाजिक बांधिलकी म्हणून आतापर्यंत शैक्षणिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात निस्वार्थीपणे महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल गौरविण्यात आले.



यावेळी डॉ.प्रा.प्रदिप ढवळ, उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.रविंद्र घोडविंदे, अध्यक्ष जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई, एफ.एम.इलिपास आणि प्रमुख पाहुणे म्हणून निर्माता, दिग्दर्शक सुधीर घागस, अध्यक्ष, विद्यासेवक, सहकारी पतसंस्था व संस्कृती मंडळ, सावळाराम जाधव, अध्यक्ष कर्जत तालुका अगरी समाज संघटना मुकेश विशे, नगरध्यक्ष , मुरबाड नगरपंचायत, राजेश लाड, नगराध्यक्ष कर्जत नगरपंचायत युवराज ठाकरे व इतर म ान्यवर उपस्थित होते.